पहा - १. विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/५/प्र.क्र.१००/१३
दिनांक १७ डिसेंबर, २०१६.
२. विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.जगन्या १४१९/५/प्र.क्र.४/का-नऊ
दिनांक ०४ मार्च, २०२०.
३. ना.उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. B(W)A-2108 of 2019/982/14845, dated 07 October, 2020.

---------

परिपत्रक क्र.१३/२०२०
दिनांक १६/१०/२०२०

"National Mission For Safety of Women" अंतर्गत महिला व बालक अंतर्भूत असलेली बलात्कार व पॉक्सो (POCSO) कायद्यांतर्गतची प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली करणेसाठी ना.शासनाकडुन विशेष जलदगती न्यायालयांची स्थापना करण्यात येत आहे. त्या अंतर्गत नंदुरबार जिल्हयाचे न्यायीक आस्थापनेसाठी एक जलदगती न्यायालय १ वर्षाचे कालावधीकरीता मंजुर करण्यात आले आहे. सदर न्यायालयाकरीता खालीलप्रमाणे कर्मचारी वृंद राहणार आहे.

०१. लघुलेखक (उच्च श्रेणी) – ०१ पद
०२. अधिक्षक – ०१ पद
०३. वरिष्ठ लिपीक – ०१ पद
०४. कनिष्ठ लिपीक – ०२ पदे
०५. शिपाई – ०२ पदे

सदर पदे ही सेवानिवृत्त कर्मचा–यांमधुन करार पध्दतीने भरावयाची आहेत. करार पध्दतीने नियुक्तीबाबत खालील अटी राहतील –

०१. करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एकावेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी राहील.
०२. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहु शकतील.
०३. संबंधित कामाचा किमान ०३ वर्षाचा अनुभव ही पुर्व अट राहील.
०४. करार पध्दतीने नियुक्त करावयाचा कर्मचारी शरिरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याचेकडे आवश्यक क्षमता असावी.
०५. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त कर्मचा–याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.
०६. सेवानिवृत्त कर्मचा–यांना करार पध्दतीने नेमणुक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्ती वेतना एवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळुन) त्यांचे मासिक परिश्रमीक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी मिळेल. एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमीक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी कायम राहील. (जास्तीत जास्त तीन वर्ष)

०७. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवासमावेशनपाचे/सामावुन घेण्याचे वा नियमीत सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

०८. करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकारी नियुक्तीसाठी सक्षम प्राधिका-यांना राहील.

०९. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.

१०. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of Interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

११. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/ माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

तरी जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायीक आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या व वर नमुद अटींची पुर्तता करण्या-या सेवानिवृत्त कर्मचा-यांनी वर नमुद पदाकरीता त्यांचे अर्ज यासोबत दिलेल्या नमुन्यात भरुन दि.२३/१०/२०२० पावेतो जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार येथे सादर करावेत किंवा जिल्हा न्यायालय, नंदुरबारचे mahdhunansc@aij.gov.in या ई-मेल वर दिनांक २३/१०/२०२० रोजीपर्यंत अर्ज करावेत.

अर्जासोबत त्यांनी त्यांचे आधारकार्डची तसेच पेन्शन पेमेंट ऑर्डर (पीपीओ)ची साक्षांकित प्रत जोडावी.

सदरचे परिपत्रक हे जिल्हा न्यायालय, नंदुरबार यांचे संकेतस्थळ https://districts.ecourts.gov.in/nandurbar वर पाहता येईल.

जिल्हा व सत्र न्यायालय,
नंदुरबार. दि.१६/१०/२०२०.

(प्रमोद एस. तरारे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार.

---

म.जा.क्र./प्रशा/९२५३/२०२०
जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार.
नंदुरबार, दिनांक १६/१०/२०२०.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषीत-

०१. म.जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, शहादा.
०२. म. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नंदुरबार/शहादा.
०३. म. मुख्य न्यायदंडाधिकारी, नंदुरबार.
०४. म. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार.
०५. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, तळोदा/नवापूर/ अक्कलकुवा/धडगाव.
०६. म. सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नंदुरबार/शहादा.
०७. म. २रे/३रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नंदुरबार/शहादा.
सदरहु जाहिरातीची एक प्रत आपले नोटीस बोर्डवर डकविण्यात यावी.
०८. सहाय्यक अधिक्षक, रोख व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, नंदुरबार.
सदरचे परिपत्रक व अर्जाचे नमुन्याची प्रत न्यायालयाचे सुचना फलकावर पसिध्द करण्यात यावी.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार.

दिनांक / /२०२०

प्रति,

म.जिल्हा व सत्र न्यायाधीश सो.
नंदुरबार.

विषय - ....................पदाकरीता अर्ज सादर करणेबाबत...

संदर्भ- जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार परिपत्रक क्र. १३/२०२०
दिनांक १६/१०/२०२०.

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन मी .....................पदाकरीता माझा अर्ज सादर करीत आहे. माझा वैयक्तिक तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | संपुर्ण नांव | | |
| २ | रहिवासाचा पत्ता | | |
| ३ | पत्र व्यवहाराचा पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक | | |
| ४ | मुळ गाव | | |
| ५ | जन्म दिनांक | | |
| ६ | हल्लीचे वय वर्षे | | |
| ७ | न्यायालयीन सेवेत कधी नियुक्त झाले होते ? व कोणत्या पदी ? | | |
| ८ | न्यायालयीन सेवेतुन सेवानिवृत्त झाल्याचा दिनांक<br>कोणत्या पदावरुन सेवानिवृत्त झाले त्या पदाचे नांव | | |
| ९ | विभागीय चौकशीची कार्यवाई चालु आहे काय ? किंवा अशा चौकशी प्रकरणी शिक्षा झालेली आहे काय ? | | |
| १० | न्यायालयीन सेवेतील कामाचा अनुभव | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | निवृत्ती वेतनाबाबत तपशिल | | |
| i) | निश्चित झालेले मुळ निवृत्ती वेतन | | |
| ii) | अंशराशिकृत मुल्य | | |
| iii) | सध्या मिळत असलेले निवृत्ती वेतन + महागाई भत्ता. | | |
| १२ | इतर तपशिल | | |

तरी माझे अर्जाचा विचार होवुन मला वर नमुद पदासाठी सेवा करण्याची संधी देणेस विनंती आहे.

आपला विश्वासु,

दिनांक - /१०/२०२०

( )

अर्जदार

सोबत- आधारकार्ड व पेन्शन पेमेंट ऑर्डरची साक्षांकीत प्रती .